# जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला

## सन 2016-17 करीता अकोला जिल्हयातील रेतीस्थळांचा लिलाव राज्य पर्यावरण विभागाच्या अनुमतीच्या अधीन राहून ई-टेंडरींग/ई-ऑक्शन प्रक्रियेव्दारे करण्यात येत आहे.

## <u>ई-निविदा-नि-ई-लिलाव सूचना</u>

सन 2016-17 करीता अकोला जिल्हयातील रेतीघाटांचे शासन निर्णय क्र. गौखनि 10/0512/प्र.क्र. 300/ख दि. 12 मार्च 2013 मधील तरतुदी व अटी शर्तीनुसार तसेच जिल्हास्तरीय पर्यावरण विभागाच्या पूर्व अनुमतीनुसार ई-निविदा व ई-लिलाव घेण्यात येत असल्याबाबत याव्दारे जाहिर सूचना देण्यात येत आहे.

१) ई - निविदा व ई- लिलाव हे जिल्हास्तरीय पर्यावरण विभागाचे अनुमतीनुसार करण्यात येत आहेत.

२) लिलावाची कार्यवाही करतांना लिलावाच्या बोलीच्या अनुषंगाने भरुन घेण्यात येणारी रक्कम नेट बॅकींग, क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, (एनईएफटी / आरटीजीएस ) पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जिल्हाधिकारी अकोला यांच्या खात्यात जमा करावी लागेल.

३) सर्वोच्च ई - निविदा, ई - लिलाव धारकाने सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, आयकर शुल्क, सर्व्हेक्षण शुल्क, भूपृष्टभाडे, भाडेपट्टा शूल्क तसेच मोजणी नकाशा जमा केल्यानंतर करारनामा करण्यात येईल.

४) शासन निर्णय क्र. गौखनि 10/0512/प्र.क्र. 300/ख दि. 12 मार्च 2013 मध्ये नमूद सर्व तरतूदी आणि अटी व शर्ती निविदाधारक/लिलावधारक यांना बंधनकारक राहतील.

प्रचलित पध्दतीनुसार (अ) अकोला जिल्हा एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च बोली (ब) तालुका एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च बोली यांची बेरीज यापैकी जे अधिक असेल त्यास मंजूरी देण्यात येईल. जिल्हा एक घटक म्हणून बोली किंवा निविदा प्राप्त न झाल्यास उपरोक्त "ब" आणि त्याच तालुक्यातील रेतीस्थळांचा समूहाकरीता समुहनिहाय प्राप्त सर्वोच्च बोलींची बेरीज यापैकी जे अधिक असेल त्यास मंजूरी देण्यात येईल.

अकोला जिल्हयातील 7 तालुक्यातील एकूण **129** रेतीस्थळाचे ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेव्दारे रेती/वाळू निर्गती करणेसाठी निविदासह आवश्यक माहिती https://eauctioncollakl.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्या akola.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे.

इच्छुक कंत्राटदारांना ई-निविदा व ई-लिलावात भाग घेण्यासाठी रेती धोरण 2013 चे अनूषंगाने विनंती करण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्याकरीता डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. https://eauctioncollakl.abcprocure.com हया वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर **संकेतस्थळावर दि. 27/09/2016 पासून दि. 06/10/2016 सायंकाळी 6.00 वाजे पर्यंत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करता येईल.** निविदेचा नमूना, प्रतिज्ञापत्र, रेती घाटाची माहिती, अटी व शर्ती, ई-टेंडरिंग व ई-ऑक्शनचा कालबध्द कार्यक्रम इत्यादी माहिती जिल्हाधिकारी, अकोला यांच्या akola.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा शुल्क रु. 5000/- (ना-परतावा), अनामत रक्कम निर्धारित किंमतीच्या 25% रक्कमांचा ऑनलाईन भरणा करुन तसेच आवश्यक कागदपत्रांची स्कॅन कॉपी अपलोड करुन **दि. 28/09/2016 पासून दि. 07/10/2016 रोजी रात्री 8.00 वाजेपर्यंत उपरोक्त**

**संकेतस्थळावरुन ऑन लाईन ई-निविदा भरता येईल**. रेती घाटासंबंधीची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवरही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

निविदेसोबत, उर्वरित रक्कम 15 दिवसात भरणा करण्याबाबत तसेच अटी शर्ती मान्य असल्याबाबत रु. 100/- च्या मुद्रांकावर विहित शपथपत्र, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक इत्यादी कागदपत्रांची स्कॅन कॉपी जोडणे आवश्यक आहे.

**ई-निविदा दि. 08/10/2016 रोजी** सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला जि. अकोला येथे **उघडण्यात येतील.** ज्या निविदाधारकांनी ई-निविदा भरली असेल तेच निविदाधारक https://www.eauctioncollakl.a bcprocure.com ह्या संकेतस्थळावर ई-लिलावात सहभाग घेवू शकतील. ई-निविदा उघडल्यानंतर ई-निविदेतील सर्वोच्च बोली ही ई-ऑक्शनकरीता बेस प्राईज धरुन ई-लिलावास सुरुवात करण्यात येईल. **ई-लिलाव प्रक्रिया दि. 09/10/2016 रोजी सकाळी 8.00 वाजे पासून दूपारी 2.00 वाजे पर्यंत या कालावधीत घेण्यात येईल.**

ई-लिलावामध्ये प्राप्त सर्वोच्य बोली अंतिम करण्यात येईल, सर्वोच्य बोलीधारकाने आणि आपल्या निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला जि. अकोला येथे दि. 09/10/2016 रोजी दुपारी 3.00 वाजता सादर करणे अनिवार्य राहिल .

ई निविदा व ई-ऑक्शन पध्दतीने रेती/ वाळू निर्गती करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

| दिनांक | तपशील |
|---|---|
| 26/09/2016 | ईच्छुक लिलावधारकांचे नोंदणी व अनुषंगीक प्रशिक्षण वर्ग सकाळी 11 ते दूपारी 2.00 वाजे पर्यंत लोकशारी सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय अकोला |
| 27/09/2016 | सकाळी 10.00 वाजता पासून ऑनलाईन रजिस्ट्रेशन (नोंदणी) सुरु होईल. |
| 06/10/2016 | सायंकाळी 6.00 वाजता निविदाधारकांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे बंद होईल. |
| 28/09/2016 | दूपारी 2.00 वाजे पासून ऑनलाईन ई - निविदा भरणे सुरु होईल. |
| 07/10/2016 | रात्री 8.00 वाजता ऑनलाईन ई - निविदा भरणे बंद होईल. |
| 08/10/2016 | ऑनलाईन प्राप्त ई - निविदा सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे डाऊनलोड करुन उघडण्यात येतील. |
| 09/10/2016 | ऑनलाईन ई-लिलाव सकाळी 8.00 वाजे पासून दूपारी 2.00 वाजे पर्यंत सुरु राहील. दुपारी 2.00 वाजता ई-लिलाव प्रक्रिया बंद होण्याआधी बोली प्राप्त झाल्यास 10 मिनीटाकरीता तीन वेळा ई-लिलाव प्रक्रियेची वेळ वाढविण्यात येईल. |

ई-निविदा व ई-लिलाव स्विकारणे किंवा नाकारणे तांत्रीक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे चालु ठेवणे वाळू घाट कमी / जास्त करणे यासंबंधीचा अधिकार जिल्हाधिकारी अकोला/अपर जिल्हाधिकारी, अकोला यांनी राखून ठेवला आहे.

टिप : गट निहाय रेतीघाटांची माहिती **https://eauctioncollakl.abcprocure.com** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. ई-टेंडर किंवा ई-ऑक्शन बाबत कोणत्याही अडचणीकरीता खालील भ्रमणध्वनी किंवा ई-मेल वर संपर्क साधावा - +91 7940016879/ 883/ 886/ 823/ 835/ 867/ 891/ 837/ 885/ 868/ 880/ 824/ 802/ 865/ Fax +91 7940016879 , Email : Sales@abcprocure.com.support@abcprocure.com

**जिल्हाधिकारी अकोला**